## 7.1.5 Water conservation facilities available in the Institution:

**Waste water and drainage maintenance**

**शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई**

क्र.शादंमवरुमुं/अ.कक्ष/बीएमसी/ 5137 /१९

प्रति,
वॉर्ड अधिकारी,
"A" वॉर्ड,
बृहन्मुंबई महानगरपालीका,
मुंबई.

20 AUG 2019
014506

विषय:- शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई, पी.डी.मेलो रोड, फोर्ट, मुंबई येथिल पडलेले झाड व तुंबलेले गटार यांची विल्हेवाट लावण्याबाबत.

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई, पी डी मेलो रोड फोर्ट, मुंबई येथिल महाविद्यालयाच्या आवारात पाऊस व वाऱ्यामुळे मोठे झाड पडलेले आहे. त्यामुळे फांदया व लाकडे यामुळे डासांचे प्रमाण वाढत आहे.

तसेच पी डी मेलो रोड वरील गटारीमुळे लाईन बंद पडलेली असल्यामुळे महाविद्यालयाच्या आवारातील वापरलेले पाणी वाहून जाण्याची गटारे बऱ्याच दिवसांपासुन तुंबलेली आहेत ज्यामुळे डासांचे प्रमाण वाढले असून रोगराई पसरु शकते.

तरी कृपया लवकरात लवकर दंत महाविद्यालय आवारातील पडलेल्या झाडाच्या फांदया, लाकडांची विल्हेवाट आणि पी डी मेलो रोड वरील मूळ गटार लाईन कार्यरत करुन महाविद्यालयातील तुंबलेले पाणी वाहून जाईल अशी सोय करुन द्यावी ही विनंती.

अधिष्ठाता,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई.
Mumbai 400 001

Govt. Dental College & Hospital

Dean
Govt. Dental College & Hospital
Mumbai 400 001

अधिष्ठाता,

शासकिय दंत महाविद्यालय

व रुग्णालय, मुंबई.

दिनांक: 9/8/19

प्रति,

विभागप्रमुख,

सार्वजनिक बांधकाम विभाग,

सेंट जॉर्जेस रुग्णालय,

मुंबई.

विषय: शासकिय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई येथील महाविद्यालय / रुग्णालयांच्या इमारतीच्या पाठच्या बाजूस जमलेले बांबु तसेच माती व रेतीची पोती व कचरा यांची विल्हेवाट लावण्याबाबत

महोदय,

वरिल विषयास अनुसरुन आपणास कळवु इच्छितो कि गेल्या चार ते पाच वर्षापासून शासकिय दंत महाविद्यालय व रुग्णालयाच्या इमारतीच्या कँटिनकडील पाठच्या बाजूस बांबू, माती, रेतीचे पोते व इतर लाकडी कचरा पडून असल्याचे आढळून आले आहे.

या कचऱ्यामुळे आजुबाजुस परिसर स्वच्छ ठेवण्यास अडथळा निर्माण होतो तसेच डास किटके यांची वाढ होत असून त्यामुळे आरोग्यावर होणारा परिणाम घातक ठरु शकतो. बाजूला स्पोर्टस् ग्राऊंड असल्यामुळे विद्यार्थ्यांना या कचऱ्याचा त्रास होतो.

तरि वरिल बाबी लक्षात घेऊन महाविद्यालयात व सभोवताली वावरणाऱ्या जनमाणसांच्या आरोग्याच्या विचाराने लवकरात लवकर ह्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात यावी ही नम्र विनंती. धन्यवादासहित सादर.

अधिष्ठाता,

शासकिय दंत महाविद्यालय व

रुग्णालय, मुंबई.

Dean
Govt. Dental College & Hospital
Mumbai 400 001

5821
8/8/19

स्वच्छता असे तेथे, आरोग्य वसे तेथे

दिनांक ८/०८/२०१९

दिनांक ०६/०८/२०१९ च्या अधिष्ठाता व सर्वविभागीय अधिकारी व शिक्षक कर्मचाऱ्यांच्या बैठकीस अनुसरून आपल्या महाविद्यालयात परिणामकारक स्वच्छता मोहिम राबवण्याचा निर्णय आहे.

बैठकीत ठरविल्याप्रमाणे प्रत्येक विभागाने आपापल्या विभागाची स्वच्छता समिती ठरवून स्वच्छता निरिक्षक डॉ. प्रियांका मचाले यांना समिती समन्वयकांची नावे व दुरध्वनी क्रमांक कळवावेत. दिनांक १३/०८/२०१९ रोजी स्वच्छता निरिक्षक डॉ. प्रियांका मचाले या प्रत्येक विभागातील स्वच्छता समन्वयकास सदर विभागाचा स्वच्छता भाग नेमुन देतील, त्याप्रमाणे प्रत्येक आठवड्यातील नेमुन दिलेला दिवस त्या त्या विभागाने स्वच्छ करणे अनिवार्य ठरले.

प्रत्येक विभागप्रमुखाने आपला विभाग, विभागाच्या आजूबाजूचा परिसर तसेच नेमून दिलेला भाग स्वच्छ ठेवला जाईल याची खात्री करावी.

स्वच्छता केलेली कमीत कमी १० छायाचित्रे महाविद्यालयाच्या alcleangdchmumbai@yahoo.com या ई-मेल वर नियमितपणे अपलोड करावी.

(सही)
अधिष्ठाता
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,
मुंबई.

प्रति,
सर्व विभागप्रमुख, शासकीय दंत महाविद्यालय, मुंबई.

(Signature)

**Dean**
**Govt. Dental College & Hospital**
**Mumbai 400 001**